REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 10 | ISSUE - 7 | APRIL - 2021

# महाराष्ट्राचा ऐतिहासिक वारसा : एक दृष्टीक्षेप

**प्रा. डॉ. अनिल दत्तू देशमुख**
**श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय, उमरगा, जि. उस्मानाबाद.**

## १ प्रस्तावना :-



महाराष्ट्र राज्य हे भारतीय संघराज्यातील एक महत्वाचे घटकराज्य आहे. १ मे १९६० रोजी सध्याच्या संयुक्त महाराष्ट्राचा भारताच्या नकाशावर उदय झाला. महाराष्ट्र हे क्षेत्रफळाच्या दृष्टीने भारतातील तिसरे व लोकसंख्येच्या बाबतीत दुसरे मोठे राज्य आहे. देशाचा पश्चिम व मध्यभाग व्यापलेल्या महाराष्ट्र राज्यास अरबी समुद्राचा ७२० किमी लांबीचा विस्तीर्ण सागरी किणारा लाभला आहे. पश्चिमेकडील सह्याद्री पर्वताच्या रांगा व पूर्वेस असलेल्या भामरागड-चिरोली -गायखुरी या डोंगरांगा नैसर्गिक सीमा आहेत. राज्याच्या वायव्येस गुजरात राज्य तसेच दादरा व नगरहवेली हे केंद्रशासित संघराज्य क्षेत्र, उत्तरेस मध्यप्रदेश, पूर्वेस छत्तीसगड, आग्नेयेस तेलंगणा, दक्षिणेस कर्नाटक व नैऋत्येस गोवा ही राज्य आहेत. मुंबई हे देशातील सर्वात मोठे शहर हे महाराष्ट्राच्या राजधानीचे शहर आहे तर नागपूर शहर महाराष्ट्राची उपराजधानी आहे. आर्थिक व शैक्षणिकदृष्ट्या महाराष्ट्र भारताचे आग्रणी राज्य आहे. ४२ टक्के नागरीकरण झालेले महाराष्ट्र हे देशातील एकमेव माठे राज्य आहे. देशातील प्रगत व मोठ्या राज्यांचा तुलनात्मक अभ्यास केल्यास अन्य कोणत्याही राज्यापेक्षा महाराष्ट्राचे दरडोई उत्पन्न हे सर्वाधिक आहे.

प्राचीन काळी भूभागाच्या विस्तारावरून त्या त्या प्रदेशास नावे दिली जात असावीत. त्यानुसार अनेक राष्ट्रांना सामावून घेणारा एक भूप्रदेश म्हणून इ.स. पूर्व ३०० च्या सुमारास या प्रदेशास महाराष्ट्र हे नाव प्राप्त झाले असावे असे मानले जाते. महानुभाव पंथाच्या सातशे वर्षापूर्वी लिहलेल्या 'श्रुतीपाठ' या ग्रंथात महाराष्ट्र कशाला म्हणावे? त्यात कोणकोणते भाग येतात? त्याच्या चतु: सीमा कोणत्या? तेथले लोक कसे व त्यांचे वैशिष्ट्ये काय? याचे तपशिलवार व उद्बोधक वर्णन दिलेले आहे. त्याचा महत्वाचा भाग खालीलप्रमाणे आहे.

देश म्हणजे खंडमंडळः जैसे फलटणपासौनि दक्षिणेशी मऱ्हाठी भाषा, जैतुला ठाई वते ते एक मंडळ । तयासी उत्तरे बालेघाटाचा शेवट असे । एसै एक खंडमंडळ । मग उभय गंगातीर तेही एक खंडमंडळ । आन तयापासौनि मेघकर घाट ते एक मंडळ । तयापासौनि अवघे वऱ्हाड तेही एक मंडळ । पर अवघाची मिळौनि महाराष्ट्राचि बोलिजे । किंचित् किंचित् भाषेचा पालट असे म्हणौनि खंडमंडळे म्हणावी । मग ऐसे मंडळीचा पैला मंडळासि जाए : आन पैले मंडळीचा ऐलासि ए । तया पुरूषाचे तेचि सेवट जाणावे । एके दसींची भूमी राजसा सात्विका पर मनुष्ये राजसे नव्हेति । ऐसे विचित्र प्रदेशाचे महद्भूतांसहित पालट असत । पदार्थाचे पालट असत । वार : झड : उष्ण : उदकें : पाषाण : वृक्ष : धान्ये : अन्न : औषधें : इत्यादिकांचे देशपरत्वे पालट असत ।

महाराष्ट्र म्हणितलेल्या तयाचे किती भेद । एक महाराष्ट्र जड । दुसरे चेतन : । इतुकेयांसि अभय वर्ते जयाचेनि ते महाराष्ट्र । ऐसै जड चेतन भेद मिळौनि महाराष्ट्र म्हणजे महंत राष्ट्र । म्हणौनि महाराष्ट्र । मंहत म्हणजे थोर । तर तेचि थोरी कवणे अर्थे असे पा । ना । सात्विक हा एक : दुसरा सुखरुप : तिसरा इष्टकारक : चौथा निर्दोष : पाचवा सगुण : । जेतुका अर्थी आपली थोरी असे तेतुलाही अर्थी आणिकासि थोरी करी । थोरापासौनी महाथोर तयातें महाराष्ट्र म्हणिजे । तर राष्ट्रशब्दे आणिक देश बोलिले असत कीं, ना, ते भूमीने थोर होति तर गुणबुध्दीने नव्हेति । आण राजस उदासहि असत । म्हणौन ते महाराष्ट्र नव्हेति । एवं जडचेतनमध्ये मागिला पांचा गुणांचे अनुवर्तन जेतुला ठाइं असेल तेतुला तेतुले ते महाराष्ट्राची जाणावे । जेथ महाराष्ट्र भाषा वर्तते ते महाराष्ट्र । चतुर्थांश महाराष्ट्र भाषा वर्तते तोहि महाराष्ट्र । महाराष्ट्री असावे ।

वरील उताऱ्यावरुन आपणाला तत्कालीन महाराष्ट्राच्या क्षेत्रविस्ताराची कल्पना येते. आज कोकण, पश्चिम महाराष्ट्र, उत्तर महाराष्ट्र (खानदेश), विदर्भ व मराठवाडा मिळून हे राज्य बनले आहे. परंतु प्राचीन कालखंडापासून ते ब्रिटीश कालखंड आणि स्वातंत्र्यानंतरची तेरा

वर्षदेखिल हे सर्व भाग एकाच राजकीय एककात नव्हते. परंतु राजकीयदृष्ट्या कधीही एकत्र नसलेले भूभाग मात्र सांस्कृतिकदृष्ट्या एकाच एककात सामावलेले होते हे विशेष.

### २. महाराष्ट्र : व्युत्पत्ती व अर्थ :-

आज महाराष्ट्र म्हटले की नजरेसमोर विशिष्ट भूभाग येतो. पण हे नाव कधी व कसे प्राप्त झाले? ते प्रदेशवाचक आहे की लोकवाचक? हे नाव प्राप्त होण्यापूर्वी हा महाराष्ट्र कोणत्या नावाने ओळखला जात होता? महाराष्ट्र या शब्दाची व्युत्पत्ती व त्याच्या अर्थाबाबत विविध विचारवंत कसा विचार करतात, याचे विवेचन महत्वाचे ठरते. 'महाराष्ट्र' या शब्दाची व्युत्पत्ती आणि त्याचा अर्थ याबाबत विद्वानात एकमत नाही. महाराष्ट्राला इसवी सनापासूनचा इतिहास लाभला आहे. महाराष्ट्र याचा अर्थ मोठे राष्ट्र किंवा महान राष्ट्र असा होतो. प्राकृत भाषेत महाराष्ट्री हा शब्द प्रचलनात होता. त्यावरुन महाराष्ट्र हा शब्द तयार झाला असा एक समज आहे. महाराष्ट्राची सर्वात जुनी नोंद इसवी सनाच्या पहिल्या शतकातील वररुची या व्याकरणकाराच्या 'प्राकृत प्रकाश' या ग्रंथात मिळते. यात वररूचीने 'महाराष्ट्री' हे या प्रदेशातील प्राकृत भाषेचे नाव नोंदविले आहे. इतिहासाचे अभ्यासक चिं. वि. वैद्य यांच्या मते, इ.स.पू. ६०० च्या सुमारास आर्य लोक दक्षिण भारतात आल्यानंतर येथे गोपराष्ट्र, पांडुराष्ट्र व मल्लराष्ट्र इत्यादी प्रकारच्या वसाहती स्थापन झाल्या. त्यातील मल्लराष्ट्र म्हणजे महाराष्ट्र होय. सम्राट अशोकाच्या शिलालेखात 'राष्ट्रीक' असा लोकसमुदायाचा उल्लेख अढळतो. त्यावरून महाराष्ट्रीक असा शब्द तयार झाला व त्यापासूनच महाराष्ट्र हे नाव रूढ झाले असावे. 'महाराठी' या शब्दाचा वापर सातवाहनाच्या लेखात, त्याचप्रमाणे त्यांच्या उत्तर काळातील कांही नाण्यावर अढळून येतो. महावंश या बौध्द ग्रंथात 'महारट्ठ' या शब्दाचा उल्लेख आहे. महाराष्ट्रातील प्राचीन उत्कीर्ण लेखात ऋषिक, अश्मक, दण्डक, कुंतल, अपरांत, आणि मुलक इ. विभागाचा दक्षिणपथाच्या संदर्भात उल्लेख आलेला आहे. विदर्भात नागपूर, भंडारा, चंद्रपूर, वर्धा आणि यवतमाळ या सध्याच्या जिल्ह्यांचा समावेश होत होता. अपरांतामध्ये सर्वसाधारणपणे सध्याच्या उत्तर कोकण आणि दक्षिण गुजरात यांचा समावेश होता तर राहिलेले इतर विभाग गोदावरी नदीच्या खोऱ्यामध्ये सर्वसाधारणपणे सामावलेले होते. कै. रा. गो. भांडारकर यांच्या मते, दक्षिणेतील रठ्ठ लोकांनाच आशोकाच्या शिलालेखात रास्टिक म्हटलेले असून, त्याचे संस्कृत रुप राष्ट्रीक झाले. रठ्ठाचे महारठ्ठ व राष्ट्रीकाचे महाराष्ट्रीक झाले. श्रीधरवर्म्याचा सेनापती सत्यनाग याने सागर जिल्ह्यातील एरण गावी स्तंभावर शिलालेख कारला असून त्यात त्याने स्वतःला 'महाराष्ट्रप्रमुख' म्हटले आहे. महाराष्ट्र देशाचा उल्लेख असलेला हा अद्य कोरीव लेख होय. अशाप्रकारे सुमारे दोन हजार वर्षापासून या प्रदेशाचे 'महाराष्ट्र' हे नाव प्रचलित आहे असे दिसते.

जॉन विल्सन यांनी मोल्सवर्थच्या शब्दकोषाच्या प्रस्तावनेत महारांचे राष्ट्र ते महार-राष्ट्र अशी व्युत्पत्ती सांगितली आहे. या मतास ज्ञानकोशकार केतकर व ओपर्ट यांनी पुष्टी दिली आहे. मात्र महामहोपाध्याय पा. वा. काणे यांनी महान राष्ट्र ते महाराष्ट्र अशी साधी सरळ व्युत्पत्ती केली आहे. राजारामशास्त्री भागवत यांच्या मते, संस्कृत नाटकामध्ये येणारा 'मरहट्ठ' हा जनवाचक शब्द 'मऱ्हाठा' शब्दाची प्रकृती दिसते. 'मऱ्हाठा म्हणजे मरता तब हटता' अशी त्यांनी 'मरहट्ठ' शब्दाची लोकगुणवाचक व्युत्पत्ती सांगितली आहे. वि. का. राजवाडे हे आपल्या 'महाराष्ट्राचा वसाहतकाल'या प्रबंधात महाराष्ट्र शब्दाची व्यत्पत्ती रट्ट शब्दावरुन झाल्याचे सुचवितात. महाराष्ट्र-महारठ्ठ-रठ्ठ या नामचिकित्सेवरुन या प्रदेशात रठ्ठ लोंकांनी मूळ वसाहत केली असे दिसते. येथील मूळ लोकांचे मूळ नाव मरहट्टे-मऱ्हाटे-मराठे असे असावे. 'मरहट्ट' हा शब्द कानडी असून "झाडीमंडळ" असा प्रदेशवाचक एक अर्थ व झाडीमंडळातील 'हट्टीजन' (पशुपालन करणारे धनगर, गवळी) असा दुसरा लोकवाचक अर्थ होतो. महाराष्ट्राला ऋग्वेदामध्ये "राष्ट्र" या नावाने संबोधले गेले आहे. आशोकाच्या काळात 'राष्ट्रीक' आणि नंतर 'महाराष्ट्र' या नावाने ओळखले जावू लागले असे ह्यु-यत-त्संग व इतर प्रवाशांच्या नोंदीवरून दिसून येते. 'महाराष्ट्र' हे नाव प्राकृत भाषेतील "महाराष्ट्री" या शब्दावरून पडले असण्याची शक्यता आहे.

मराठी भाषेच्या पायावर महाराष्ट्राचे एकीकरण साधण्याचा पहिला प्रयत्न महाभावांनी केला. महाराष्ट्राचे महत्व त्यांनीच प्रथम ओळखले. 'महाराष्ट्र म्हणजे महंत राष्ट्र म्हणोन महाराष्ट्र' असे महानुभावी ग्रंथकारांनी आचारमहाभाष्याच्या चोविसाव्या सूत्रावरील भाष्यात सांगितले आहे. उदयतन सुरीने लिहलेल्या कुवलयमाला या आठव्या शतकातील ग्रंथात तत्कालीन महाराष्ट्रीयांचे व त्यांच्या भाषेचे वर्णन केले आहे. ते असे -

दढमडह सामलिंगे सहिरे कलहसीले य।
दिणिल्ले गहिल्ले उल्लविरे तत्थ मरहट्टे ।।

'मराठे कसे दिसतात ? बळकट, खुजट व काळपट, अभिमानी, सहनशील व कलहशील. बोलतात कसे ? दिण्णल्ले, गहिले असे.' यु एन च्युआंगने चालुक्यकालीन मराठ्यांचे जे वर्णन केले आहे, त्याच्याशी हे तंतोतंत जुळते. यु एन च्युआंगा हा तत्वचिंतक चिनी प्रवासी सातव्या शतकात भारत दर्शनासाठी आला होता. तेंव्हा त्याला मराठी प्रदेशातील मराठे लोक कसे दिसले, कसे वाटले याचे वर्णन लिहून ठेवले आहे. तो म्हणतो :

"या मराठी लोकांची वागणूक साधी व सचोटीची आहे. ते प्रामाणिक व तुटक-अबोल आहेत. कोणी सहृदयता दाखविली तर ते त्याला कृतज्ञ राहतील याची खात्री बाळगावी. पण त्यांना कोणी दुखविले तर मात्र ते त्याचा बदला घेतील. आपला अपमान धुऊन काढण्यात ते प्रसंगी

प्राणही वेचतील. संकटात सापडलेल्याने साद घातली तर त्याच्या मदतीला धावून जाण्यात ते स्वतःचा विचारसुध्दा करणार नाहीत. अपमानाचा बदला घेताना ते वैऱ्याला सावध करतील. युध्दात पळणाऱ्या शत्रूचा ते पाठलाग करतील, पण शरणागताला अभय देतील."

अशाप्रकारे अनेक साहित्यात महाराष्ट्र व मराठी लोकांचे वर्णन आलेले दिसून येते. थोडक्यात, ज्या सलग प्रदेशातील बहुसंख्य स्थायिक लोक मराठी भाषा बोलतात व मुख्यत्वेकरून मराठीतून व्यव्हार करतात, तोच महाराष्ट्र असे म्हणता येईल.

### ३. महाराष्ट्राचा ऐतिहासिक वारसा :-

महाराष्ट्राला प्रदिर्घ प्राचीन परंपरा दिसून येते. महाराष्ट्र ही परिवर्तनशील भूमी आहे. अनेक स्थित्यंतरे आणि प्रचंड उलथापालथी येथे घडून आल्या आहेत. 'इतिहास' या ग्रंथात गुरूदेव रवींद्रनाथ टागोर यांनी स्पष्ट नमुद केले आहे की, "इतिहास केवळ महाराष्ट्रातच घडला." म्हणजे इतर प्रांतांना इतिहास नाही असे नाही, परंतु त्या सर्व प्रांतापेक्षा महाराष्ट्र हा वैशिष्ट्येपुर्ण प्रांत आहे. येथील मराठी समाजाला सतत जागृतीचे वरदान लाभलेले आहे. कालपरत्वे असंख्य विद्वान आणि उतुंग व्यक्तिमत्वाचे नायक-महानायक या महाराष्ट्रभूमीने भारत देशाला बहाल केले आहेत. म्हणूनच महाराष्ट्राचा ऐतिहासिक वारसा समजून घेणे उद्‌बोधक व म्हणूनच महत्वाचे आहे.

### ३.१ प्रगैतिहासिक महाराष्ट्र (इ.स.पू.सु. १५०००० ते इ.स.पू. ७००)

महाराष्ट्रात प्रगैतिहासिक काळात किंवा आश्मयुगात मानवाने वस्ती केली होती याचा पुरावा १९४० सालापर्यंत उपलब्ध झालेला नव्हता. मानवाने एकदम ऐतिहासिक काळातच प्रथम वस्ती केली असेच बहुतेक विद्वानांचे मत होते. १८६३ साली गोदावरी काठी मुंगी पैठण येथे आश्मयुगीन मानवाने बनवलेले ॲगेट दगडाचे छिलका हत्यार सापडले. याच प्रदेशात रानटी हत्तीच्या अश्मास्थी मिळाल्या त्यानंतर १९०४ साली नाशिक जिल्ह्यातील नांदूर मधमेश्वर या ठिकाणी अनेक प्राचीन हत्तींचे अवशेष मिळाले. महाराष्ट्रातील गिरणा, तापी, वैणगंगा, कृष्णा, प्रवरा, घोड, मूळा, इ. निरनिराळ्या नद्यांच्या खोऱ्यात १९३९ सालापासून प्राचीन अश्मयुगीन हत्यारे सापडली आहेत. याशिवाय रानटी हत्ती, रानबैल, गेंडा इत्यादींच्या अश्मास्थीही सापडल्या असल्याने प्राचीन अश्मयुगीन काळात महाराष्ट्रात मानवाची वस्ती होती हे सिध्द झालेले आहे, मात्र इतक्या प्राचीन काळातील मानवांचे अवशेष मात्र सापडले नाहीत.

### ३.२ प्राचीन महाराष्ट्र (इ.स.पू. ६०० ते इ.स. १३१८)

लोहयुगाची सुरूवात महाराष्ट्रात इ.स.पू. आठवे ते सातवे शतक इतकी मागे नेता येते. कांही विद्वानांच्या मते मराठवाड्यातील नांदेड आणि नंदाचे 'नवनंदडेहरा' हे एकच असावे. नंदाच्यानंतर आलेल्या चंद्रगुप्त मौर्याच्या साम्राज्याचा विस्तार लक्षात घेता महाराष्ट्राशी त्याचा थोडाफार संबंध आला असावा. सम्राट अशोकाचा मात्र महाराष्ट्राशी संबंध होता, हे महाराष्ट्रात सापडलेल्या सोपारा येथील गिरीलेखावरून कळून येते. मौर्य साम्राज्याच्या ऱ्हासानंतर सातवाहनांचा उदय झाला. सातवाहन हे महाराष्ट्रावर राज्य करणारे पहिले महाराष्ट्रीयन घराणे होते. ख्रिस्तपूर्व दुसऱ्या शतकापासून ते इसवीसनाच्या दुसऱ्या शतकापर्यंत सातवाहनांनी आपली सत्ता गाजविली. त्यांची राजधानी महाराष्ट्रातील पैठण (पूर्वीचे प्रतिष्ठान) ही होती. सातवाहनांनी महाराष्ट्रातील कला, विद्या, शेती, व्यापार क्षेत्राचे संरक्षण आणि संवर्धन करून महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनाचा पाया घातला. इ. स. ७८ पासून सातकर्णी राजाच्या कार्यकाळापासून महाराष्ट्रात 'शालीवाहन शक' ही कालगणना रूढ झाली.

सातवाहनानंतर एकछत्री अंमल नष्ट होऊन अनेक लहान लहान घराणी व त्यांची राज्य उदयास आली. त्यापैकी महत्वाचे वाकाटक घराणे होय. सर्वसाधारणपणे तिसरे शतक ते पाचवे शतक वाकाटकांचा कालखंड मानण्यात येतो. त्यांच्या कारकिर्दीत कला आणि वाङमय यांची भरभराट झाली. इसवी सनाच्या आठव्या ते दहाव्या शतकापर्यंत राष्ट्रकुटांनी महाराष्ट्रावर अधिपत्य गाजविले. या घराण्यातील पहिला कृष्ण याने संपूर्ण महाराष्ट्र व दक्षिण कोकण आपल्या अंमलाखाली आणला. याच राजाच्या आज्ञेनुसार वेरूळचे जगद्‌विख्यात कैलास लेणे निर्माण केले गेले. वाङमय, ललितकला, वास्तुशिल्प यांना राष्ट्रकुटांनी उत्तेजन दिले. याबद्दल महाराष्ट्रात आलेले अरबी प्रवाशी प्रशंशोद्‌गार काढतात. इ.स. ९७३ च्या सुमारास राष्ट्रकुटांचा अस्त होऊन कल्याणीच्या चालुक्य घराण्याची सत्ता उदयाला आली. ती इ.स. ११८९ पर्यंत टिकली. वरील प्रमुख राजवटीखेरीज या काळात कोल्हापूरचे शिलाहार, उत्तर कोकणातील भोज आणि गोमांतकातील कदंब या राजवटींनी स्थानिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली.

### ३.३ मध्ययुगीन महाराष्ट्र (इ.स. १३१८ ते इ.स. १८१८)

तेराव्या शतकाच्या प्रारंभी दक्षिण भारताच्या राजकारणात ठळकपणे झळकू लागलेल्या यादव घराण्याच्या राजवटीपासून १८१८ साली पेशवाईच्या अस्तापर्यंतच्या कालखंडाला 'मध्ययुगीन कालखंड' या संज्ञेने संबोधण्याची इतिहासकारांची प्रथा आहे. या कालखंडात महाराष्ट्रात खूप घडामोडी दिसून येतात.

### ३.३.१ यादवकालीन महाराष्ट्र :-

शिलाहारांच्या कांहीसे समकालीन पण नंतर सत्ताधीश झालेले यादव हे खऱ्या अर्थाने महाराष्ट्राचे राजे होते. त्यांची राजधानी प्रारंभी नाशिक जिल्ह्यातील सिन्नर (पुर्वीचे सेऊनपूर) येथे असावी पुढे ते औरंगाबाद जिल्ह्यातील दौलताबाद (पूर्वीचे देवगिरी) येथे हाती. यादव काळात मराठी भाषा, वाङ मय, संस्कृती यांचा उत्कर्ष झाला. याच काळात अंबाजोगाईत (पूर्वीचे अंबानगरी) मुकूंदराजांनी 'विवेकसिंधू' मराठीतील अद्यकाव्य लिहले. चक्रधर स्वामींनी स्थापन केलेला महानुभाव पंथ व महानुभावांचे 'चरित्र ग्रंथ' व 'साती ग्रंथ' याच काळात निर्माण झाले. ज्ञानेश्वरीचा जन्मही यादव काळातच झाला. ज्ञानेश्वर, निवृत्तीनाथ, मुक्ताबाई, सोपानदेव, नामदेव, गोराकुंभार, सावता माळी, विसोबा खेचर, सेना न्हावी यासारखी संतमंडळी व त्यांचे वाङ मय याच काळात उदयास आले.

### ३.३.२ महाराष्ट्रातील मुस्लीम राजवटी :-

दहाव्या शतकानंतर इस्लामचा महाराष्ट्रात शिरकाव झाला. इ.स. १३१८ ते १६४७ असा सुमारे तीन शतके महाराष्ट्र मुस्लीम सत्तेखाली राहिला. सर्वप्रथम अल्लाऊद्दीन खिलजीने या प्रदेशावर स्वाऱ्या करून खूप संपत्ती लुटुन नेली त्यामुळे यादवांची आर्थिक व राजकिय शक्ती नष्ट झाली. अल्लाऊद्दीन खिलजीनंतर देवगिरीचे साम्राज्य महंमद तुघलकाच्या अधिपत्याखाली आले. महंमद तुघलकाच्याच काळात देवगिरीचे नामांतर दौलताबाद असे झाले. इ.स. १३४७ मध्ये हसन गंगू बहामनशहा याने बहामणी राज्याची स्थापना केली. पंधराव्या शतकाच्या शेवटी बहामणी राज्याचे विघटन होऊन पाच स्वतंत्र राज्य अस्तित्वात आली. त्यात १) वऱ्हाडची इमादशाही (१४४८) २) अहमदनगरची निजामशाही (१४८५) ३) विजापूरची अदिलशाही (१४८९) ४) बीदरची बरीदशाही (१४९२) ५) गावळकोंड्याची कुतूबशाही (१५५२) यांचा समावेश हाता. त्यांनी अनेक पराक्रमी मराठा सरदारांच्या मदतीने राज्यकारभार चालवून आपले वर्चस्व टिकविले. बहामणी राज्याचे हे पाचही तुकडे दिल्लीच्या मोगल सम्राटाने जिंकून घेतले.

### ३.३.३ मराठा सत्तेचा कालखंड :-

महाराष्ट्राचे भौगोलिक वेगळेपण, संतांचे सामाजिक धार्मिक सुधारणांचे प्रयत्न, त्यातून झालेले सामाजिक संघटन, दक्षिणेतील मराठेपूर्व सत्तातील संघर्ष व त्यातून मराठ्यांत जागृत झालेली राजकिय महत्वकांक्षा, तसेच छत्रपती शिवरायांचे नेतृत्व यातून महाराष्ट्रात मराठी सत्तेचा राजकीय सत्ता म्हणून उदय झाला. निजामाच्या दरबारी असलेले सरदार शहाजी राजे यांचे पुत्र शिवाजी यांनी सतराव्या शतकात त्यागी, शूर, निष्ठावान अशा मावळ्यांना संघटीत करून मुस्लीम राजवटीविरुध्द संघर्ष केला व वयाच्या सोळाव्या वर्षी हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. इ.स. १६७४ मध्ये शिवाजी महाराजांनी रायगडावर राज्याभिषेक करून घेतला व सर्व जाती धर्माचे कल्याणकारी राज्य स्थापन केले. त्यांनीच सर्वप्रथम सर्वसामान्यांमध्ये स्वातंत्र्याची ज्योत पेटवण्यात व त्यांना संघटीत करण्यात यश मिळवले. म्हणूनच शिवाजीला भारतीय जनतेने राष्ट्रीय वीरपुरूष मानले. मराठेशाहीच्या कारकिर्दित महाराष्ट्राच्या इतिहासाला वेगळे वळण मिळाले, मराठी अस्मिता जागृत झाली व मराठी जनतेचा उत्कर्ष घडून आला. त्यानंतर महाराष्ट्रात पेशवाईचा कार्यकाल सुरू झाला. छत्रपती शिवाजी महाराजांची रायगड ही राजधानी होती, नंतर पेशव्यांच्या काळात पुणे येथे राजधानी होती. पाणिपतच्या तिसऱ्या युध्दात मराठी सत्ता पराभूत झाली. इ.स. १८१८ मध्ये पेशवाईचा अंत झाला आणि महाराष्ट्रात ब्रिटीश राजवट सुरु झाली.

### ३.४ आर्वाचिन किंवा ब्रिटीशकालीन महाराष्ट्र (इ.स.१९१८ ते १९४७)

ईस्ट इंडीया कंपनीने पेशवाईच्या अस्तानंतर मुंबई ही महाराष्ट्राची राजधानी बनवली व महाराष्ट्राला विशाल मुंबई ईलाख्याचा एक भाग बनविला आणि मुंबई ईलाख्यात प्रचारात असणारी प्रशासनव्यवस्था या भागाला लागू केली. माऊंट स्टुअर्ट एलिफिस्टनला कांही दिवस आयुक्त नेमून पुढे मुंबईचा गव्हर्नर नेमले. त्याने एतद्देशियांना न दुखावता महाराष्ट्रात कांही मौलिक सुधारणा केल्या आणि मुंबई ईलाख्यात कंपनी सरकारचे राज्य स्थिरस्थावर करण्याचा प्रयत्न केला. सावधगिरी आणि जुण्याची जपणूक हे त्याच्या एकूण राजनितीचे प्रमुख सूत्र होते. एकोणिसाव्या शतकात भारतीयांमध्ये ब्रिटीशांविरूध्द स्वातंत्र्याची भावना वाढीस लागली. या स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासात महाराष्ट्र प्रमुख केंद्रस्थानी राहिला. गांधींचे गुरू गोपाळकृष्ण गोखले, लोकमान्य टिळक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, इ. राष्ट्रीय पातळीवरील प्रमुख व्यक्तींचा उदय याच काळामध्ये झाला.

भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात विदर्भ व मराठवाडा या भागांचा वाटाही उल्लेखनीय आहे. १९०२ मध्ये हैद्राबादच्या निजामाने बेरार (वऱ्हाड) हा मोठा भूप्रदेश ब्रिटीश सरकारला भाड्याने दिला. तेंव्हा तो मध्यप्रदेशाला जवळ म्हणून शासकीयदृष्ट्या मध्यप्रांतात गेला. या भागातील काँग्रेसजणांनी सर्व राष्ट्रीय काँग्रेसच्या अंदोलनात सहभाग घेतला.

मराठवाड्याचा बराचसा भूभाग हैद्राबाद संस्थानच्या आखत्यारीत होता. स्वामी रामानंद तीर्थ यांच्या मार्गदर्शनाखाली हैद्राबाद संस्थानात हैद्राबाद स्टेट काँग्रेसने स्वातंत्र्याचा लढा दिला. संस्थानाने या काँग्रेसवर बंदी घातली आणि अनेक नेत्यांना तुरूंगात डांबून छळ केला. वंदे मातरम सत्याग्रह आणि छोडो भारत अंदोलनात मराठवाड्याने विशेष सहभाग घेऊन काँग्रेसला साथ दिली.

रामराव देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली २८ जानेवारी १९४० ला मुंबईत संयुक्त महाराष्ट्र सभा स्थापन झाली आणि बेळगावच्या १९४६ च्या मराठी साहित्य संम्मेलनात प्र. के. अत्रे व ग. त्र्य. माडखोलकरांनी संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीची घोषणा केली. स्वातंत्र्य अंदोलनातील नेत्यांची सुटका १९४५ मध्ये झाली आणि भारतीय स्वातंत्र्याबरोबर मुंबई राज्याची स्थापना झाली.

## ४. महाराष्ट्र धर्म आणि संस्कृती :-

मध्ययुगीन महाराष्ट्रातील संताच्या सामाजिक धार्मिक सुधारणामुळे मराठी सत्तेच्या उदयाची तयार झालेली नैतिक पार्श्वभूमी म्हणजे महाराष्ट्र धर्म होय. न्यायमुर्ती रानडे यांनी 'Rise of Maratha Power' या ग्रंथात प्रथम ही संकल्पना मांडली. 'महाराष्ट्र धर्म' ही चित्तवेधक कल्पना आहे. या जोमदार शब्दाभोवती कित्येक वर्ष महाराष्ट्राचे राजकारण आणि धर्मकारण फिरत होते. महाराष्ट्र धर्माप्रमाणे आंध्र धर्म, पंजाब धर्म, कर्नाटक धर्म अशा प्रदेशवाचक धर्मसंज्ञा अढळत नाहीत. त्यामुळे महाराष्ट्र धर्माला इतिहासात वैशिष्ट्यपुर्ण स्थान आहे. आजही कांही राजकीय पक्षाचे राजकारण महाराष्ट्र, मराठी या भावनेभोवती फिरताना दिसते. त्याला ही ऐतिहासिक पार्श्वभूमी दिसून येते.

महाराष्ट्र आज सांस्कृतिक क्षेत्रात समृध्द समजला जातो कारण तसा समृध्द वारसा महाराष्ट्राला लाभला आहे. महाराष्ट्रातील संतपरंपरा ही त्या वारशाचा एक महत्वाचा भाग आहे. मध्ययुगीन महाराष्ट्रात संताच्या पुढाकराने महाराष्ट्र धर्म, भागवत धर्म, मानणारी भक्ती चळवळ सुरू झाली. या चळवळीने जातीभेदात विखुरलेल्या हिंदू समाजाला सामाजिक समतेत बांधण्याचा व त्यांच्यात स्वधर्माची ज्योत पेटवण्याचा यशस्वी प्रयत्न केला. मराठी संतांनी समाजसुधारणेच्या अनुषंगाने लोकजागृतीचे केलेले कार्य महाराष्ट्राच्या सांस्कृतिक व सामाजिक जडणघडणीस मोठ्या प्रमाणात पुरक ठरले. म्हणून एका अर्थाने हे संत समाजसुधारकच होते. न्यायमुर्ती रानडे 'Rise of Maratha Power' या ग्रंथात म्हणतात,"जातीतील विषमता कमी करून संतांनी महाराष्ट्राच्या भूमीत ऐक्य निर्माण केले. त्यांनी शुद्र-अतिशुद्राबरोबरच स्त्रीयांमध्येही नवचैतन्य निर्माण करून त्यांच्यात मानवतेच्या भावनेने स्वधर्म जागवला, त्यामुळेच शिवरायाला राजकीय क्रांती करता आली."

भक्ती चळवळीमुळे जातीभेद, वर्गभेदाच्याच नव्हे तर भौगोलिक भेदाच्या सीमादेखिल पुसल्या गेल्या. आषाढी, कार्तिकी वारीला महाराष्ट्रातील मराठवाडा, विदर्भ, कोकण, खानदेश, पश्चिम महाराष्ट्र अशा सर्व उप-प्रदेशातील लोक एकत्र येतात. त्यामुळे त्यांच्यात सांस्कृतिक एकात्मता व भौगोलिक बंधुभाव दिसून येतो. इरावती कर्वे लिहितात,"मी संपूर्ण महाराष्ट्र फिरले पण पंढरपूरच्या वारीमध्येच मला संपूर्ण महाराष्ट्र एकत्र दिसला." भक्ती चळवळीने केवळ धार्मिक उदारवादच स्वीकारला नाही तर या चळवळीने महाराष्ट्राची प्रादेशिक ओळख ठळक केली. त्यामुळेच महाराष्ट्रात मराठी राज्याच्या उदयाची व समाजसुधारणाची पार्श्वभूमी तयार झाली.

## ५. सारांश / समारोप :-

कोणत्याही ज्ञात अशा ऐतिहासिक कालखंडात मराठवाडा, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र, खानदेश, वऱ्हाड, कोकण हे सर्व भाग अगदी सातवाहन, राष्ट्रकुट, वाकाटक यांच्यापासून ते यादवकाळ व अखेरचा मराठा कालखंड, त्यानंतर ब्रिटीश काळात आणि स्वातंत्र्यानंतर तेरा वर्षदेखिल एकाच राजकीय एककात कधीच नव्हते. कधी एखादा भाग या राजाकडे, दुसरा त्या राजाकडे, तर तिसरा तिसरीकडेच असे. ब्रिटीश काळात पश्चिम महाराष्ट्राचा बराच भाग प्रचंड अशा मुंबई प्रेसिडेंसीमध्ये, दक्षिणेतील कांही भाग मद्रास प्रातांत, मराठवाडा निजामाकडे नागपूर वऱ्हाड मध्यप्रांतात होते. मूळ वऱ्हाडात अमरावती, अकोला, यवतमाळ, बुलढाणा या चार जिल्ह्याबरोबर नांदेड व परभणी या दोन जिल्ह्यांचेही नाव घेतले जात असत. हा प्रांत निजामाच्या हैद्राबाद संस्थानात होता. निजामावर ब्रिटीशांचे कर्ज झाले म्हणून ते ऋण फेडण्यासाठी निजामाने पहिले चार जिल्हे ब्रिटीशांना वहीवाटीसाठी दिले, त्यावर मालकी मात्र निजामाची होती. म्हणूनच 'खल्क खुदा का, मुल्क (निजाम) बादशहा का और अमंल कंपनी सरकार का' अशी ओळ त्यावळी वऱ्हाडात प्रचलित होती. सांगण्याचा उद्देश राजकीयदृष्ट्या कधीही एकत्र नसलेले भूभाग सांस्कृतिकदृष्ट्या एकाच एककात सामावलेले होते. राजकीयदृष्ट्या कधी शत्रूच्या मुलखात असूनही, दळण-वळणाची, संवादाची साधने नसूनही महाराष्ट्राने ही सांस्कृतिक एकात्मता साध्य केली हे महाराष्ट्राचे मोठे संचित आहे. मराठी भाषिक अनेक शतके या प्रदेशात राहत असले तरी एकसंघ मराठी भाषिक राज्य मात्र १ मे १९६० साली अस्तित्वात आले.

## संदर्भ ग्रंथ सूची

१. महाराष्ट्राची आर्थिक पाहणी -२०१३-१४, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, ४ जुन २०१४.

२. डॉ. भालचंद्र मुणगेकर, देशाच्या आर्थिक प्रगतीचे नेतृत्व करण्यास महाराष्ट्र सक्षम, (लेख) स्वर्णमहोत्सवी महाराष्ट्र विषेशांक, लोकराज्य, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई, एप्रिल-मे २०१०.

३. प्रा. के. आर. बंग, महाराष्ट्र शासन आणि राजकारण,विद्या बुक्स् पब्लिशर्स, औरंगपूरा, औरंगाबाद, २००९.

४. तर्कतीर्थ लक्ष्मण शास्त्री जोशी, संपादक, मराठी विश्वकोश, खंड-१२, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई.

५. प्रा. ए. बी. सवदी, द मेगा स्टेट महाराष्ट्र, निराली प्रकाशन, पुणे, (तृ.आ.) १९९९.

६. व्ही. एस. क्षीरसागर, अस्सा हा महाराष्ट्र, के'सागर पब्लिकेशन, पुणे, २००४.

७. चिं. ग. कर्वे, स. आ. जोगळेकर व प. गो. जोशी, संपादक, महाराष्ट्र परिचय, प्रसाद प्रकाशन, पुणे, १९५४.

८. तुकाराम जाधव, महाराष्ट्र वार्षिकी-२०१३, युनिक अकादमी प्रकाशन, पुणे, २०१३.
९. प्रा. बी. बी. पाटील, महाराष्ट्र शासन आणि राजकारण, फडके प्रकाशन, कोल्हापूर, २००५.
१०. व. म. सिरशीकर, आधुनिक महाराष्ट्राचे राजकारण, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, २००१.
११. सरदार गं. बा. (मुख्य संपादक), महाराष्ट्र जीवन परंपरा, पगती आणि समस्या, खंड १, जोशी आणि लोखंडे प्रकाशन, पुणे, १९६०.
१२. पगडी सेतु माधवराव, महाराष्ट्र आणि मराठे, जोशी आणि लोखंडे प्रकाशन, पुणे, १९६३.
१३. प्रा. दिनेश मोरे, आधुनिक महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास, के. एस. पब्लिकेशन, पुणे, २००६.
१४. मोरे सदानंद,' एकोणिसाव्या शतकातील वारकरी संप्रदाय', (लेख) आधुनिकता आणि परंपरा, एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्र, (प्रा. य. दि. फडके गौरव ग्रंथ, संपादक, व्होरा राजेंद्र) प्रतिमा प्रकाशन, पुणे, २०००.
१५. कुलकर्णी बी. आर. (संपादक), मराठी साहित्य संम्मेलन : अध्यक्षीय भाषणे, vol.- II, महाराष्ट्र साहित्य परिषद प्रकाशन, पुणे, १९७२.
१६. अरूण साधू, संयुक्त महाराष्ट्र : स्वप्नपुर्ती की स्वप्नभंग ?, (लेख), बदलता महाराष्ट्र ,संपादक, भा. ल. भोळे व किशोर बेडकिहाळ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर अकादमी प्रकाशन, सातारा, २००३.